# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष**

---

**अर्ज स्विकृतीची अंतिम तारीख : ३१/०१/२०१८ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत**

## प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदासाठीची जाहीरात

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जलस्वराज्य- २ कार्यक्रमाच्या राज्य स्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी कनिष्ठ/ शाखा अभियंता, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष हे पद १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने कनिष्ठ / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संवर्गातून भरावयाचे आहे.

उपरोक्त पदासाठीचा अर्जाचा नमुना, कामाचे स्वरूप, अटी व शर्ती निवड प्रक्रिया इत्यादींबाबतचा सविस्तर तपशिल https://water.maharashtra.gov.in व www.maharashtra.gov.in (Rojgar) तसेच https://jalswarajya.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरातीचा व सुचनांचा बारकाईने अभ्यास करून आपला अर्ज सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह दि. ३१/०१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत अवर सचिव, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४ या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहीत वेळेनंतर / तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारणात येणार नाही. अपूर्ण स्वरूपातील अर्ज पदभरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन सदर पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

**स्थळ :- बेलापूर, नवी मुंबई**
**दिनांक :- ०३/०१/२०१८.**

सही/-
उप सचिव तथा प्रकल्प संचालक
सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
बेलापूर, नवी मुंबई.

---

**सिडको भवन (दक्षिण कक्ष), बेलापूर,नवी मुंबई-४००६१४.**
दूरध्वनी .- 022-27565087 ,**फॅक्स क्र.** 022-27562343,ई-मेल-us11.jal2@gmail.com
वेब**साईट** :- https://jalswarajya.maharashtra.gov.in

**जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत कनिष्ठ/ शाखा अभियंता, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ या पदावरील नेमणूकीसाठी अटी व शर्ती**

- **कनिष्ठ/ शाखा अभियंता, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई** या पदासाठी कामाचे स्वरूप, वेतनश्रेणी इत्यादी बाबींसाठी शासन निर्णय क्र. जस्वप्र-०११४/ प्र.क्र.०५/पापु-११, दिनांक ०६/०२/२०१४ चे शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन करावे.
- उमेदवाराने परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करून त्यानंतर किमान ५ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेला असणे आवश्यक राहील.
- प्रतिनियुक्तीसाठी अर्ज करताना मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत पाठवावा. अर्जामध्ये सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची पूर्व संमती व ना हरकत स्पष्टपणे नमूद असावी.
- उमेदवार संपूर्ण सेवेत कमाल १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी प्रतिनियुक्तीवर असल्यास अर्ज करण्यास पात्र ठरणार नाही.
- उमेदवार याआधी प्रतिनियुक्तीवरुन मूळ विभागात प्रत्यावर्तित झाला असल्यास मूळ संवर्गात किमान ५ वर्षांचा कालावधी त्याने पूर्ण केलेला असल्यासच अर्ज करण्यास पात्र राहील.
- प्रतिनियुक्तीवर असलेल्या उमेदवारास अर्ज करता येणार नाही.
- उमेदवाराच्या सेवानिवृत्तीस किमान ४ वर्षांचा कालावधी शिल्लक असणे आवश्यक राहील.
- उमेदवाराविरुद्ध भ्रष्टाचार/ लाचलुचपत गुन्ह्यांसदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरण,महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे, ते अर्ज करण्यास पात्र ठरणार नाही.
- याव्यतिरिक्त पात्रतेसंदर्भात या विभागाचा शासन निर्णय क्रमांक: क्र. जस्वप्र-०११४/ प्र.क्र.०५/पापु-११, दिनांक ०६/०२/२०१४ व सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही- २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि. १७/१२/२०१६ तसेच या विभागाचा शासन निर्णय क्रमांक: क्र. आस्था-०२१७/ प्र.क्र.०८/पापु-०१, दिनांक १०/१०/२०१७ च्या तरतुदी लागू राहतील.
- हे पद जलस्वराज्य- २ कार्यक्रमासाठीच राहील. जलस्वराज्य कार्यक्रमाचे प्रस्तावित कामकाजाचा कालावधी संपल्यानंतर सदर पद व्यपगत होईल. प्रतिनियुक्तीच्या या पदावरील अधिका-यास मूळ विभागाकडे प्रत्यावर्तित करण्यात येईल.

- प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून वैध ठरलेल्या अर्जदारांची निवड प्रकिया या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: क्र. जस्वप्र-०११४/ प्र.क्र.०५/पापु-११, दिनांक ०६/०२/२०१४, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही- २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि. १७/१२/२०१६ आणि या विभागाचा शासन निर्णय क्रमांक: क्र. आस्था-०२१७/ प्र.क्र.०८/पापु-०१, दिनांक १०/१०/२०१७ यांच्या तरतुदींस अनुसरुन राहील. या जाहीरातीस अनुसरून प्राप्त होणा-या अर्जदारांची यादी तसेच निवड प्रक्रियेसाठी पात्र व अपात्र उमेदवाराची यादी या विभागाच्या https://water.maharashtra.gov.in तसेच https://jalswarajya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येईल. पात्र उमेदवारांना आवश्यकतेप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. याबाबतची वेळ, दिनांक, निवडलेल्या उमेदवाराचे नाव, निवड प्रक्रियेच्या सर्व सूचना https://water.maharashtra.gov.in तसेच https://jalswarajya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येईल. उमेदवारांना कोणत्याही सूचना थेट पत्रव्यवहार किंवा ई-मेल या अन्य माध्यमातून दिले जाणार नाही.
- प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर मूळ कागदपत्र तसेच त्यांच्या साक्षांकित प्रतीसह विहीत तारीख व वेळेस उपस्थित राहावे. उमेदवार विहीत तारीख व वेळेत उपस्थित न राहिल्यास शासन जबाबदार नाही.
- निवड प्रक्रियेसंबंधी सर्व माहीती शासनाच्या https://water.maharashtra.gov.in व https://jalswarajya.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध राहील. या प्रक्रियेमध्ये वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करण्याची तसेच निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
- उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवास खर्च किंवा इतर कोणत्याही भत्ता शासनाकडून दिला जाणार नाही.
- अर्ज संबंधित ठिकाणी विहीत मुदतीत सादर करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. पोष्टाद्वारे अर्ज सादर करताना होणाऱ्या विलंबास संबंधित विभाग जबाबदार राहणार नाही. विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- **उमेदवारांनी लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाबाबत :-**

  **“सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथील कनिष्ठ/ शाखा अभियंता पदासाठी अर्ज”** असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
- प्रतिनियुक्ती वरील अधिकारी यांना सेवा मूळ विभागाकडे पाठविण्याचे अंतिम अधिकार अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे राहतील.